# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७

संदर्भ क्र. शै.प्रवेश/४३१८

दिनांक : ०२.०९.२०१४

प्रति,
मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे–४११ ००७.

**विषय– स्कॉलरशिप/फ्रीशिपबाबत...**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष सन २०१४–२०१५ करीता आपल्या विभागात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय तसेच खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता शासनाकडून खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती/फ्रीशीप सवलती उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१. अपंग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती
२. *ई.बी.सी सवलत योजना }
३. *पी.टी.सी. सवलत योजना (प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी सवलत) } *प्रकाशन विभागात आवेदनपत्रे उपलब्ध होतील.
४. *एस.टी.सी. सवलत योजना (माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी सवलत) }
५. संरक्षण खात्यातील सेवकांचे पाल्यांकरीता सवलत योजना
६. माजी सैनिकांच्या पाल्यांकरीता सवलत योजना
७. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती
८. अहिंदी शिष्यवृत्ती
९. एकलव्य आर्थिक योजना

वरील आवेदनपत्राच्या कोऱ्या प्रती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सदर आवेदनपत्रे आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांकडून भरून घेवून दिनांक **१७ सप्टेंबर, २०१४** अखेर या कार्यालयाकडे नोंद करून पाठवावीत.

अपूर्ण व चुकीची माहिती असलेले आवेदनपत्रे तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेली आवेदनपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

शिष्यवृत्ती/फ्रीशिप आवेदनपत्रे भरून घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना सोबत जोडल्या आहेत. शिष्यवृत्ती व फ्रिशिप आवेदनपत्रे भरणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती भरावयाचा तक्ता सोबत जोडला आहे. प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती/फ्रिशिप याप्रमाणे वेंगवेगळी भरून Excel Format मध्ये करून सीडी व हार्ड

कॉपीसह पाठवावी. कोणत्याही विद्यार्थ्याला आवेदनपत्रे घेण्यासाठी अथवा भरून परत देण्यासाठी या कार्यालयात पाठवू नये.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या राष्ट्रीयकृत बॅकेत बॅकखाते उघडणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांनी त्यांचा खातेक्रमांक, बॅकेचा संपूर्ण पत्ता, बॅक आय.एफ.एस. कोड (११ आकडी), बॅकेचा एम.आय.सी.आर. कोड इ. माहिती अर्जात बिनचूकपणे नमूद करावी. अन्यथा सदर अर्जाचा विचार करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

**सोबत:—** शिष्यवृत्ती/फ्रिशिपबाबत मार्गदर्शक सूचना.

**टिप :— अधिकची माहिती महाराष्ट्र शासनाच्या संकेस्थळावर पाहावी.**

## शिष्यवृत्ती/फ्रीशिप आवेदनपत्र भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना

आवेदनपत्र सुवाच्च्य अक्षरात संपूर्ण भरावे. कोणताही रकाना रिकामा ठेवू नये.

### अपंग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती

१. आवेदन पत्रावर स्वत:चा फोटो लावावा व त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी घ्यावी.
२. त्रिस्तरीय डॉक्टरांची स्वाक्षरी व सही असलेले ससून हॉस्पिटल, पुणे यांचा अपंगत्वाचा दाखला.
३. मागील वर्षाची गुणपत्रिका
४. विद्यापीठात प्रवेश घेतल्याबाबत दाखला.

### ई.बी.सी. अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत

१. उत्पन्न मर्यादा रू १,००,०००/— इतकी राहील. (उत्पन्नाचा दाखल आवश्यक)
२. अर्जावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी/शिक्का आवश्यक आहे.
३. विद्यापीठात फी भरल्याची पावती
४. मागील वर्षाची गुणपत्रिका

### एस.टी.सी/पी.टी.सी. आवेदनपत्राबाबत माहिती

१. अर्जावर शाळेच्या मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शिक्का आवश्यक आहे.
२. गटशिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.
३. शाळेचा मान्यतेचा क्रमांक लिहावा
४. विद्यापीठाची फी भरल्याची पावती.
५. अर्जावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी/शिक्का असावा.
६. मागील वर्षाची गुणपत्रिका

### माजी सैनिक/संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतीबाबत

१. मागील वर्षाची गुणपत्रिका
२. प्रवेश घेतल्याबाबतचे प्रवेशपत्र (फी पावती)
३. जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड यांचे सेवेत असल्याबाबतचे पत्र जोडावे.
४. माजी सैनिकांच्या पालकांचा डिस्चार्ज दाखला जोडावा.

### राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

१. अर्जावर विद्यार्थ्यांचा फोटो असावा. त्यावर विभागप्रमुखांची सही व शिक्का असावा.
२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न रू. १,००,०००/— पेक्षा कमी असावे. (उत्पन्नाचा दाखला आवश्यक)
३. मागील तीन वर्षाच्या गुणपत्रिका तसेच फी भरल्याची पावती जोडावी.

## अहिंदी शिष्यवृत्ती

१. आवेदनपत्रावर स्वत:चा फोटो लावावा. त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा.
२. मागील वर्षाची गुणपत्रिका (साक्षांकित).
३. उत्पन्नाचा दाखला.
४. विद्यापीठात फी भरल्याची पावती.
५. विद्यार्थी हिंदी विषयाचा पूर्णवेळ अध्ययन करणारा असावा.
६. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. मातृभाषा हिंदी नसावी.

## एकलव्य आर्थिक सहाय्य योजना

१. पदवी परीक्षेस विज्ञान शाखेकरिता किमान ७० टक्के गुण तर कला, वाणिज्य, विधी शाखेकरीता किमान ६० टक्के गुण असावेत (गुणांची टक्केवारी कमी/जास्त होण्याची शक्यता असते).
२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. १००,०००/— पेक्षा कमी असावे.
३. नूतनीकरणाकरीता किमान ७५ टक्के उपस्थिती व पहिल्या वर्षी सर्व विषयात उत्तीर्ण होवून किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत.

## महत्वाच्या सूचना :—

१. एस.सी./डीटीएनटी./एस.बी.सी./ओ.बी.सी./या प्रवर्गीय विद्यार्थ्यांची प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाली असल्यास सलग व्दितीय वर्षाकरिता शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरण्याची आवश्यकता आहे.

२. ई.बी.सी./पी.टी.सी./एस.टी.सी./सर्व्हिसमन/एक्स.सर्व्हिसमन/एकलव्य/अहिंदी/अपंग/राष्ट्रीय गुणवत्ता या शिष्यवृत्ती सवलती घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क/इतर शुल्क पूर्ण भरणे जरूरीचे आहे.

३. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास शिष्यवृत्ती मिळत नाही.

४. शैक्षणिक गॅप असल्यास व्दितीय वर्षाचे स्कॉलरशिप/फ्रीशिप आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे.

५. आवेदनपत्राबरोबरच वसतिगृह असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६. शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती ७५ टक्के असणे आवश्यक आहे. हे विभागप्रमुखांनी प्रमाणित करावे.

७. नूतनीकरण करताना मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमास विद्यार्थी शिकत होता ती परीक्षा त्याने उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

८. शिष्यवृत्ती/फ्रीशिप आवेदनपत्रासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे विभागप्रमुखांनी साक्षांकित केलेली असावीत.

९. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती/फ्रीशिप आवेदनपत्र सादर केल्यास जात पडताळणी दाखला जोडणे आवश्यक आहे.

१०. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक व परीक्षा शुल्क घेवू नये.

११. एका विद्यार्थ्यास एकच शिष्यवृत्ती किंवा फ्रीशिप किंवा सवलत मिळेल.

१२. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या राष्ट्रीयकृत बॅंकेत बॅंकखाते उघडणे बंधनकार आहे.

१३. विद्यार्थ्यांनी त्यांचा UID No. (आधार कार्ड क्र.), बॅंक खातेक्रमांक, बॅंकेचा संपूर्ण पत्ता, बॅंक आय.एफ.एस. कोड (११ आकडी), बॅंकेचा एम.आय.सी.आर. कोड इ. माहिती अर्जात बिनचूकपणे नमूद करावी. अन्यथा सदर अर्जाचा विचार करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## शिष्यवृत्ती संदर्भातील विद्यार्थ्यांची माहिती शैक्षणिक वर्ष २०१४–१५

विभागाचे नाव :

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे पूर्ण नाव | जन्मतारीख | प्रवेश घेतलेला वर्ग | मागील परीक्षेतील एकुण गुण व गुणांची टककेवारी | एकुण वार्षिक उत्पन्न | एकुण भरलेले शुल्क | बॅंकेचे नाव (लाभार्थीचा बॅंक खाते क्रमांक) | लाभार्थीचा बॅंक खाते क्रमांक | बॅंकेचो एम. आय. सी. आर. कोड | आय.एफ.एस. कोड | आधार कार्ड क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे : ४११००७